# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 20 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २० डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्या विरोधातला अविश्वास प्रस्ताव उपसभापतींनी फेटाळला.
- मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत डिसेंबरचा हप्ता हिवाळी अधिवेशन संपताच, बहिणींच्या खात्यात जमा केला जाईल–मुख्यमंत्र्यांची ग्वाही.
- विधान परिषदेच्या सभापतिपदी प्राध्यापक राम शिंदे यांची बिनविरोध निवड.
- २०२४–२५ च्या पुरवणी मागण्यांना विधानसभेत मंजुरी.

आणि

- चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत भारत–पाकिस्तान सामने तटस्थ ठिकाणी घेणार असल्याचं आयसीसीकडून स्पष्ट.

****

उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्या विरोधातला अविश्वास प्रस्ताव उपसभापती हरिवंश यांनी फेटाळून लावला. सभापतींची प्रतिष्ठा डागाळण्याच्या उद्देशाने अत्यंत घाईगडबडीत आणलेल्या या प्रस्तावात त्रुटी असल्याचं उपसभापतींनी सांगितलं. घटनात्मक संस्थांवर चिखलफेक करणं, हाच या प्रस्तावाचा उद्देश असल्याचं निरीक्षण त्यांनी नोंदवलं आहे.

****

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दलच्या वक्तव्यावरुन विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या कामकाजात कालही व्यत्यय आला. लोकसभेचं कामकाज प्रथम दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

राज्यसभेतही कामकाज सुरु झाल्यावर विरोधकांनी या मुद्यावर दिलेला स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यामुळे विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. त्यानंतर कामकाज सुरू झाल्यावर सत्ताधारी पक्षाच्या खासदार फागनोक कोन्याक यांनी खासदार राहुल गांधी यांच्या सदनाबाहेरच्या आक्षेपार्ह वर्तनाबाबत सभापतींकडे तक्रार केली.

दरम्यान, संसद भवन परिसरात सत्ताधारी आणि विरोधकांच्या वतीनं काल आंदोलन करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा काँग्रेसकडून होत असलेल्या अपमानाविरोधात भाजपाच्या खासदारांनी आंदोलन केलं, तर बाबासाहेबांबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या वतीनं मोर्चा काढण्यात आला. यावेळी भाजपचे प्रताप सारंगी आणि मुकेश राजपूत धक्का लागून पडल्याने जखमी झाले. आपल्याला राहुल गांधी यांचा धक्का लागल्याचा आरोप सारंगी यांनी केला. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी याचा निषेध करत, राहुल गांधी यांनी या वर्तनाबद्दल माफी मागावी, असं म्हटलं आहे.

या धक्काबुक्कीत आपल्यालाही इजा झाल्याचं कांग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. या प्रकाराची सविस्तर चौकशी करण्याची मागणी त्यांनी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडे केली.

या प्रकरणी, भाजपनं राहुल गांधी यांच्याविरोधात तर काँग्रेसनं भाजप खासदारांच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, सत्ताधारी आणि विरोधकांच्या समर्थकांनी काल राज्यात मुंबई, छत्रपती संभाजीनगर, हिंगोलीसह अनेक ठिकाणी आंदोलनं केली.

दरम्यान, कोणताही राजकीय पक्ष किंवा खासदारांना संसद भवनाच्या कोणत्याही प्रवेशद्वारासमोर आंदोलन करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिले आहेत.

****

मागच्या सरकारनं सुरू केलेल्या सर्व योजना आपलं सरकार सुरू ठेवणार असून, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत डिसेंबरचा हप्ता हिवाळी अधिवेशन संपताच, बहिणींच्या खात्यात जमा केला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. गेल्या अधिवेशनात राज्यपालांच्या अभिभाषणाच्या धन्यवाद

प्रस्तावावरच्या चर्चेला मुख्यमंत्र्यांनी काल विधानसभेत उत्तर दिलं, त्यावेळी ते म्हणाले.

***आज यानिमित्त या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की, कोणतीही शंका मनात ठेवू नका. ही जी आश्वासनं आम्ही दिलेली आहेत, ज्या ज्या योजना आम्ही सुरू केलेल्या आहेत, एकही योजना आम्ही बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी महायुतीवर प्रेम दाखवलं, हे अधिवेशन संपल्याबरोबर डिसेंबर महिन्याचा हप्ता त्यांच्या खात्यामध्ये आम्ही टाकतो आहोत.***

लाडकी बहीण योजनेतल्या अपात्र लाभार्थ्यांना काढून टाकण्याचं सुतोवाचही त्यांनी केलं. नऊ लाख कृषीपंप आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. मागेल त्याला सौरपंप आपण देणार असून, तीन महिन्यात सौरपंपाची जोडणी देण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राबाबत विरोधकांचे सर्व आरोप खोडून काढतांना, सध्या ईव्हीएमसोबत कार्यरत असलेली व्हीव्हीपॅट यंत्रणा म्हणजे मतपत्रिकेवर मतदान घेतल्यासारखंच असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं. विविध पक्षांच्या नेत्यांनी मतदानाच्या टक्क्याबाबत, टपाली मतदानाबाबत, तसंच इतरही अनेक मुद्यांवर घेतलेल्या आक्षेपांचं मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उदाहरणं देत निरसन केलं. जनतेनं दिलेला कौल विरोधकांनी स्वीकारावा, असं आवाहनही त्यांनी केलं.

****

विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या चर्चेला उत्तर दिलं. महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचं राज्य करतानाच, विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची असून, आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. जनतेच्या विश्वासामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आता अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचं वचन देत असल्याचं, त्यांनी नमूद केलं.

****

परभणी आणि बीड जिल्ह्यात झालेल्या घटना या पुरोगामी महाराष्ट्राला तसंच संताच्या भूमीला कलंक लावणाऱ्या आहेत, अशी टीका, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. ते काल परभणी आणि बीड

जिल्ह्यातल्या घटनेबाबत विधानसभेत बोलत होते. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी जबाबदार पोलिसांवर अद्याप कठोर कारवाई का केली नाही असा प्रश्न त्यांनी विचारला.

****

विधान परिषदेचे सभापती म्हणून राम शिंदे यांची बिनविरोध निवड झाली. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी याबाबतची घोषणा केली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसंच विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राम शिंदे यांचं स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

****

वर्ष २०२४-२५ च्या पुरवणी मागण्यांना विधानसभेत मंजूरी देण्यात आली. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सात हजार ४९० कोटी २४ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे. पुरवणी मागण्यांवरील मुद्यांना मंत्र्यांच्या माध्यमातून लेखी उत्तर देणार असल्याचं, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सांगितलं. फुलंब्रीच्या आमदार अनुराधा चव्हाण यांनी या चर्चेत सहभागी होत, आपल्या मतदार संघातल्या विविध रस्त्यांच्या कामाचे कार्यारंभ आदेश निघून पाच महिने उलटून गेल्यावरही कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली नसल्याकडे लक्ष वेधलं. विहित मुदतीत काम सुरू न करणाऱ्या कंत्राटदाराचं कंत्राट रद्द करण्याची मागणी त्यांनी केली.

****

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवर लावलेलं २० टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. त्यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून ही मागणी केली आहे.

****

पाकिस्तानात होणाऱ्या आगामी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत भारत पाकिस्तान सामने, तटस्थ ठिकाणी होणार असल्याचं, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं काल स्पष्ट केलं. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीत यजमान पाकिस्तानसह भारत, अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, इंग्लंड, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघांचा समावेश आहे. स्पर्धेचं वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं आयसीसीच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

पुढच्या वर्षी भारतात होणारी महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धा, तसंच २०२६ मध्ये भारत–श्रीलंकेत होणाऱ्या टी ट्वेंटी विश्वचषकातल्या भारत पाक सामन्यांसाठी हाच नियम लागू राहणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सर्व शासकीय कार्यालयात येत्या मंगळवारपर्यंत सुशासन सप्ताह राबवण्यात येत आहे. या सुशासन सप्ताहात जनतेने सहभागी व्हावं असं आवाहन उपजिल्हाधिकारी संगीता राठोड यांनी केलं आहे.

> ***हा जो सप्ताह आहे तो केंद्र सरकारने साजरा करण्याच्या सूचना दिल्या आहेत या सप्ताह मध्ये ज्या काही सर्व सामान्य जनतेच्या – गोरगरिबांच्या ऑन लाईन आणि ऑफ लाईन दोन्ही प्रकारच्या तक्रारींचा निपटाला करायचा आहे मी आपल्या जिल्ह्यातील सर्व जनतेला आवाहन करते की आपण या सप्ताह मध्ये जास्तीत जास्त प्रमाणामध्ये आपल्या ज्या काही अडचणी असतील ज्या विभागाशी बंधित असतील त्या विभागाशी आपण संपर्क करावा.***

****

हिंगोली जिल्ह्यात २४ डिसेंबरदरम्यान सुशासन सप्ताह पाळला जात आहे. काल पहिल्याच दिवशी जिल्ह्यात विविध कार्यालयातर्फे नागरिकांची सनद वाचनाने या सप्ताहास प्रारंभ झाला. आज याअंतर्गत जिल्ह्यातल्या सर्व तहसील कार्यालयामार्फत सामाजिक सहाय्य योजनेचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिबिराचं आयोजन करण्यात येणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात नळदुर्ग परिसरातल्या कुरनूर पाणी वितरण व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी मंजूर निधीपैकी, १३ कोटी ९७ लाख रुपये निधी उपलब्ध झाला आहे. १० गावांतल्या तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला याचा लाभ होणार असल्याची माहिती तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

दरम्यान, टेंभुर्णी– लातूर महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी केंद्र सरकारने ५७४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी ही माहिती दिली.

****

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी परभणी जिल्ह्यातल्या जिंतूर इथं काल आसूड मोर्चा काढण्यात आला. यावेळी तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आलं.

****

केंद्रीय आयुष मंत्रालयाकडून संपूर्ण देशभर २६ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर या कालावधीमध्ये "देश का प्रकृती परीक्षण" अभियानाचा पहिला टप्पा राबवण्यात येत आहे. धाराशिवच्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाकडूनही शहराच्या विविध भागात जाऊन नागरिकांची आरोग्य तपासणी केली जात आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष यांनी, नागरिकांना या अभियानात आरोग्य तपासणी करून घेण्याचं आवाहन केलं आहे.

****

जालना तालुक्यात इंदेवाडी इथं जमिनीच्या फेर दुरुस्तीसाठी २० हजार रुपये लाच घेणाऱ्या तलाठ्यास जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडलं. शिवदास प्रेमसिंग पवार असं या तलाठ्याचं नाव आहे.

****